# Order No. FLD-12A18/ C.R.-220/ F-10

## Forest Land - Palghar

**Re-diversion of 22.230 Ha. of Forest Land under Forest (Conservation) Act, 1980 for Surya Regional Water Supply Scheme planted to provide the bulk water supply Mira-Bhayander, Vasai-Virar Municipal Corporation and 27 villages outside the VVCMC area by laying underground water supply line in favour of Superintendent Engineer, Water Supply Resource Management Cell, Mumbai Metropolitan Regional Development Authority, Bandra (East), Mumbai.**

**Government of Maharashtra**
**Revenue and Forest Department**
**Government Order No. FLD-12A18/ C.R.-220/ F-10**
**Mantralaya, Mumbai- 400 032.**
**Date : 30/10/2019**

**Read :**

1) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/2/I.D.-/941/2018-19, dated 25/07/2018.
2) Letter from Government of Maharashtra of even no., dated 09/08/2018.
3) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur F.No.FC-2/MH-87/2018-NGP/4478, dated 22/10/2018.
4) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/2/I.D.-12606/(64)/436/2019-20, dated 19/06/2019. No. Desk-17/NC/2/I.D.-12606/(64)/934/2018-19, dated 31/08/2019.
5) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur No.F.No.FC-2/MH-87/2018-NGP/5752, dated 24/09/2019.

**Order :-**

Whereas, the Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at sr. no. 1 above has submitted a proposal which has been received from Superintendent Engineer, Water Supply Resource Management Cell, Mumbai Metropolitan Regional Development Authority, Bandra (East), Mumbai for Re-diversion of 22.230 Ha. of Forest Land for Surya Regional Water Supply Scheme planted to provide the bulk water supply Mira-Bhayander, Vasai-Virar Municipal Corporation and 27 villages outside the VVCMC area by laying underground water supply line under Forest (Conservation) Act, 1980 to the State Government.

AND whereas, this project is of public importance and as per Government of India, Forest (Conservation) Act, 1980 guidelines the project is site specific and non availability of alternative non-forest land for the project was considered.

AND whereas, Government of Maharashtra after careful scrutiny and consideration, vide its letter referred at sr. no. 2 above has recommended it to the Government of India to Re-divert the 22.230 Ha. of Forest Land for the above project under section 2 of Forest (Conservation) Act, 1980.

AND whereas, Government of India after due consideration, vide its letter referred at sr. no. 3 above granted in-principle approval to above proposal submitted by Government of Maharashtra for Re-diversion of forest land under section 2 of Forest (Conservation) Act, 1980. The said approval is subject to fulfillment of certain conditions by the User Agency mentioned in its letter dated 22/10/2018.

AND whereas, the Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide its letters referred at sr. no. 4 above has submitted compliance of those conditions to the Government of India, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur.

AND whereas, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur accorded final approval under section 2 of forest (Conservation) Act, 1980, for the purpose of above proposal from the Superintendent Engineer, Water Supply Resource Management Cell, Mumbai Metropolitan Regional Development Authority, Bandra (East), Mumbai for for Re-diversion of 22.230 Ha. of Forest Land for Surya Regional Water Supply Scheme planted to provide the bulk water supply Mira-Bhayander, Vasai-Virar Municipal Corporation and 27 villages outside the VVCMC area by laying underground water supply line with certain conditions, vide its letter referred at sr. no. 5 above.

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 22.230 Ha. consisting of Reserved Forest, Protected Forest & Private Forest Land more specifically described in the proposal submitted, vide letter mentioned at sr. no.-1 here in above from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be Re-diverted to the User Agency, i. e. Superintendent Engineer, Water Supply Resource Management Cell, Mumbai Metropolitan Regional Development Authority, Bandra (East), Mumbai for Surya Regional Water Supply Scheme planted to provide the bulk water supply Mira-Bhayander, Vasai-Virar Municipal Corporation and 27 villages outside the VVCMC area by laying underground water supply line. The Re-diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the letter dated 22/10/2018 & dated 24/09/2019 of Government of India. This approval for Re-diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency -

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle and final approval letters of Government of India, referred above. The Chief Conservator of Forest (Territorial), Thane shall ensure the strict compliance of the conditions by the Project Authority. CCF (T), Thane will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.
2. Non-compliance of any of the conditions mentioned in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Deputy Conservator of Forests shall report through the State Govt. to Deputy Director General of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

### SCHEDULE

| Sr. No. | Village Name | Survey/ Gut No. | Area (in Ha.) | Legal Status |
|---|---|---|---|---|
| 1. | Nandgaon | 107/28 | 0.165 | Protected Forest |
| | | 80/A 44, 71 | 0.264 | Protected Forest |
| | | 125/92 | 0.096 | Reserved Forest |
| 2. | Aavdhani | 92/1 | 0.825 | Protected Forest |
| 3. | Chilhar | 43 | 0.060 | Protected Forest |
| | | 21/130,137, 122A, 119 | 0.303 | Protected Forest |
| | | 40/33 to 36, 30 | 0.672 | Protected Forest |
| | | 45/2 | 0.054 | Protected Forest |
| 4. | Wada | 27/2, 27/1 | 0.198 | Protected Forest |
| 5. | Khadkona | 16 | 1.840 | Protected Forest |
| 6. | Mendhvan | 35 | 0.200 | Protected Forest |
| | | 36 | 0.188 | Protected Forest |
| 7. | Somta | 69 | 0.344 | Protected Forest |
| | | 102 | 0.328 | Protected Forest |
| | | 103 | 0.217 | Protected Forest |
| 8. | Barhanpur | 273/283 | 0.340 | Protected Forest |
| | | 219 | 0.172 | Reserved Forest |
| 9. | Tawa | 72 | 0.108 | Protected Forest |
| | | 73 | 0.276 | Protected Forest |
| | | 144 | 0.024 | Reserved Forest |
| 10. | Ghol | 103 | 0.057 | Protected Forest |
| | | 104 | 0.180 | Reserved Forest |
| 11. | Sasunavghar/ Majlipada | 249, 312A, 372, 371 | 0.789 | Protected Forest |
| 12. | Bapane | 11 | 0.240 | Protected Forest |
| 13. | Sativali | 105, 1-A | 0.282 | Protected Forest |
| 14. | Pelhar | 354, 282 | 0.462 | Protected Forest |
| 15. | Kaner/ Khairpada | 178, 7/6, 68/1 | 0.504 | Protected Forest |
| 16. | Shirsad | 79 | 0.018 | Protected Forest |
| 17. | Khanivade | 156 | 0.184 | Protected Forest |
| 18. | Bhalivali | 44 | 0.296 | Protected Forest |
| | | 34, 51 | 1.357 | Protected/ Reserved Forest FDCM |
| 19. | Bhatane | 431 | 0.188 | Protected Forest |
| | | 171, 441, 159 | 0.836 | Protected/ Reserved Forest |
| 20. | Sakvar | 83 | 0.121 | Protected Forest |
| | | 14 | 1.180 | Reserved Forest |
| 21. | Bharol | 119, 117 | 2.732 | Reserved/ Protected Forest |
| 22. | Dhekale | 102, 101, 114 | 1.964 | Protected Forest |
| 23. | Sativali | 101, 90 | 0.642 | Protected Forest |
| | | 104/28 | 0.030 | Protected Forest |
| 24. | Kude | 123 | 0.240 | Protected Forest |
| | | 122 | 0.491 | Protected Forest |
| 25. | Haloli | 133, 132, 134 | 1.335 | Protected Forest |
| 26. | Saye | 14/165 | 0.501 | Reserved Forest |
| 27. | Durves | 151, 159 | 0.198 | Protected/ Reserved Forest |
| 28. | Ten | 45 | 0.096 | Protected Forest |
| | | 36, 34 | 0.252 | Private Forest |
| 29. | Savarkhand | 66 | 0.264 | Protected Forest |
| 30. | Takvahal | 33, 27 | 0.117 | Reserved/ Protected Forest |
| **Total Forest Area (in Hectare)** | | | **22.230** | |

### ABSTRACT

| Sr. No. | Division | Reserved Forest | Protected Forest | Private Forest | Total Forest Area |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Dahanu | 4.460 | 10.935 | 0.252 | 15.647 |
| 2. | FDCM Dahanu | 4.288 | 0.00 | 0.00 | 4.288 |
| 3. | Thane | 0.00 | 2.295 | 0.00 | 2.295 |
| **Total Forest Area (in Hectare)** | | 8.748 | 13.231 | 0.252 | **22.230** |

This Government Order of Maharashtra Government is available on its website **www.maharashtra.gov.in** Reference no. for this is 201910301221337319. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

**Sign/-**
**Additional Principal Chief Conservator of Forests**
**(Mantralaya)**

The conditions and safe guards imposed by the Central Government while granting forest clearances in this case are

1. Legal status of the forest land shall remain unchanged.
2. Compensatory afforestation
   (a) Compensator afforestation shall be taken up by the Forest Department Over 23.00 ha degraded forest land (Sur. No. 315, Village- Agvan. Teh- Dahanu. Dist. Palghar) at the cost of the User Agency. As far as possible, a mixture of local indigenous species shall be planted and monoculture of any species may be avoided.
3. The complete compliance of the FRA, 2006 shall be ensured by way of prescribed certificate from the concerned District Collector;
4. The Pipeline shall be laid down 1.5 meter below the ground and after lying down of pipe line the ground will be leveled;
5. User Agency shall obtain Environmental Clearance as per the provisions of the Environmental (Protection) Act, 1986, if applicable;
6. The layout plan of the proposal shall not be changed without prior approval of Central Government;
7. No labour camp shall be established on the forest land;
8. Sufficient firewood, preferably the alternate fuel, shall be provided by the User Agency to the labourer after purchasing the same from the State Forest Department or the Forest Development Corporation or any other legal source of alternate fuel:
9. The boundary of the diverted forest land shall be suitably demarcated on ground at the project cost, as per the directions of the concerned Divisional Forest Officer:
10. No additional or new path will be constructed inside the forest area for transportation of construction materials for execution of the project work;
11. The period of diversion under this approval shall be co-terminus with the period of lease to be granted in favour of the user agency or the project life. whichever is less:
12. The forest land shall not be used for any purpose other than that specified in the project proposal;
13. The forest land proposed to be diverted shall under no circumstances be transferred to any other agencies, department or person without prior approval of Govt. of India;
14. The user Agency and the State Government shall ensure compliance of all the Court orders, provisions, rules, regulations and guidelines for the time being in force as applicable to the project;
15. Violation of any of these conditions will amount to violation of Forest (Conservation) Act. 1980 and action would be taken as per the MoEF & CC Guideline F. No. 1142/2017-FC dt 29/01/2018;
16. Any other condition that the Ministry of Environment, Forests & Climate change may stipulate from time to time in the interest of conservation, protection and development of forests & wildlife.

**By order**

Fulrani

# शासन आदेश क्रमांक : एफएलडी-१२अ१८/प्र.क्र.२२०/फ-१०

(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

**वनजमिन-पालघर**

**वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत अधिक्षक अभियंता, पाणी पुरवठा स्त्रोत संसाधन व्यवस्थापन कक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना सुर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत मीरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र व वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राबाहेरील २७ गावांमध्ये पाणी पुरवठा करणेस्तव भूमिगत पाईपलाईन टाकण्यासाठी २२.२३० हेक्टर वनक्षेत्राचे पुर्नवळतेकरणाबाबत.**

## महाराष्ट्र शासन

**महसूल व वन विभाग**

**शासन आदेश क्रमांक : एफएलडी-१२अ१८/प्र.क्र.२२०/फ-१०**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक : ३०/१०/२०१९**

**वाचा :-**

१) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एनसी/२/आयडी-/९४१/२०१८-१९, दि.२५/०७/२०१८.

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक, दि.०९/०८/२०१८.

३) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र. क्र.एफ.नं.एफसी-२/एमएच-८७/२०१८-एनजीपी/४४७८, दिनांक २२/१०/२०१८.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. डेस्क-१७/एन सी/२/आयडी-१२६०६/(६४)/४३६/२०१९-२०, दि.१९/०६/२०१९. डेस्क-१७/एन सी/२/आयडी-१२६०६/(६४)/९३४/२०१९-२०, दि. ३१/०८/२०१९.

५) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.एफ.नं.एफसी-२/एमएच-८७/२०१८-एनजीपी/५७५२, दि. २४/०९/२०१९.

**आदेश :-**

ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी अधिक्षक अभियंता, पाणी पुरवठा स्त्रोत संसाधन व्यवस्थापन कक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सूर्या प्रादेशिक पाणी-पुरवठा योजनेंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र व वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राबाहेरील २७ गावामध्ये पाणी पुरवठा कारणास्तव भूमिगत पाईपलाईन टाकण्यासाठी २२.२३० हेक्टर वनक्षेत्राचे पुरर्वळतेकरणाचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, प्रस्तुत प्रस्ताव हा एक जनहितार्थ प्रकल्प असून, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या मार्गदर्शक सूचनानुसार हा प्रकल्प स्थळ विवक्षित (site specific) आहे. तसेच या योजनेसाठी पर्यायी वनेत्तर जमिन उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेण्यात आली.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर उपरोक्त अ.क्र.२ येथील पत्रानुसार वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अन्वये २२.२३० हेक्टर वनक्षेत्राचे पुनर्वळतेकरण करण्याची भारत सरकारला शिफारस केली आहे.

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर नीट विचार करुन, राज्य शासनाने वन (संवर्धन), अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली सादर केलेल्या प्रस्तावास वरील अ.क्र.-३ अन्वये तत्वत: मंजुरी दिलेली आहे. ही मंजुरी भारत सरकारच्या दिनांक २२/१०/२०१८ रोजीच्या पत्रात नमूद केलेल्या अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे.

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसरंक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-४ येथील पत्रान्वये तत्वत: मान्यता पत्रातील अटींचा पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांना सादर केला होता.

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांनी ठाणे व पालघर जिल्हयातील २२.२३० हेक्टर इतकी वनजमिन उपरोक्त प्रकल्पासाठी काही अटींसह वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये पुर्नवळती करण्यास अंतिम मान्यता प्रदान केली आहे.

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच अधिक्षक अभियंता, पाणी पुरवठा स्त्रोत संसाधन व्यवस्थापन कक्ष, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बांद्रा (पूर्व), मुंबई यांना, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत सूर्या प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेंतर्गत मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्र, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र व वसई-विरार महानगरपालिका क्षेत्राबाहेरील २७ गावांमध्ये पाणी पुरवठा करणेस्तव भूमिगत पाईपलाईन टाकण्यासाठी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या पत्रासह जोडलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशीलात नमूद केलेली आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली ज्यामध्ये, राखीव, संरक्षित व खाजगी वन क्षेत्र समाविष्ट आहे, अशी एकूण २२.२३० हेक्टर वन जमिन या प्रस्तावासाठी पुर्नवळती करण्यात यावी. हे वळतीकरण भारत सरकारच्या दिनांक २२/१०/२०१८ व दिनांक २४/०९/२०१९ रोजीच्या पत्रांतील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे.

१. वर नमूद केलेल्या भारत सरकारच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रामध्ये विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), ठाणे याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.

२. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना व या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन), १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

३. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non-compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत उप महासंचालक वने (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

## अनुसूची

| अनु. क्र. | गावाचे नाव | सर्व्हे/गट नंबर | वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | वैधानिक दर्जा |
|---|---|---|---|---|
| १. | नांदगाव | १०७/२८ | ०.१६५ | संरक्षित वने |
| | | ८०/अ ४४, ७१ | ०.२६४ | संरक्षित वने |
| | | १२५/९२ | ०.०९६ | राखीव वने |
| २. | अवढाणी | ९२/१ | ०.८२५ | संरक्षित वने |
| ३. | चिल्लार | ४३ | ०.०६० | संरक्षित वने |
| | | २१/१३०,१३७, १२२अ, ११९ | ०.३०३ | संरक्षित वने |
| | | ४०/३३ ते ३६, ३० | ०.६७२ | संरक्षित वने |
| | | ४५/२ | ०.०५४ | संरक्षित वने |
| ४. | वाडा | २७/२, २७/१ | ०.१९८ | संरक्षित वने |
| ५. | खडकोना | १६ | १.८४० | संरक्षित वने |
| ६. | मेंढवण | ३५ | ०.२०० | संरक्षित वने |
| | | ३६ | ०.१८८ | संरक्षित वने |
| ७. | सोमटा | ६९ | ०.३४४ | संरक्षित वने |
| | | १०२ | ०.३२८ | संरक्षित वने |
| | | १०३ | ०.२१७ | संरक्षित वने |
| ८. | बऱ्हाणपूर | २७३/२८३ | ०.३४० | संरक्षित वने |
| | | २१९ | ०.१७२ | राखीव वने |
| ९. | तवा | ७२ | ०.१०८ | संरक्षित वने |
| | | ७३ | ०.२७६ | संरक्षित वने |
| | | १४४ | ०.०२४ | राखीव वने |
| १०. | घोळ | १०३ | ०.०५७ | संरक्षित वने |
| | | १०४ | ०.१८० | राखीव वने |
| ११. | ससुनवघर/ मालजीपाडा | २४९, ३१२ अ, ३७२, ३७१ | ०.७८९ | संरक्षित वने |
| १२. | बापाणे | ११ | ०.२४० | संरक्षित वने |
| १३. | सातीवली | १०५, १-अ | ०.२८२ | संरक्षित वने |
| १४. | पेल्हार | ३५४, २८२ | ०.४६२ | संरक्षित वने |
| १५. | कणेर/खैरपाडा | १७८, ७/६, ६८/१ | ०.५०४ | संरक्षित वने |
| १६. | शीरसाड | ७९ | ०.०१८ | संरक्षित वने |
| १७. | खानीवडे | १५६ | ०.१८४ | संरक्षित वने |
| १८. | भालीवली | ४४ | ०.२९६ | संरक्षित वने |
| | | ३४, ५१ | १.३५७ | संरक्षित / राखीव वने FDCM |
| १९. | भाताणे | ४३१ | ०.१८८ | संरक्षित वने |
| | | १७१, ४४१, १५९ | ०.८३६ | संरक्षित / राखीव वने |
| २०. | सकवार | ८३ | ०.१२१ | संरक्षित वने |
| | | १४ | १.१८० | राखीव वने |
| २१. | भारोळ | ११९, ११७ | २.७३२ | राखीव / संरक्षित वने |
| २२. | ढेकाळे | १०२, १०१, ११४ | १.९६४ | संरक्षित वने |
| २३. | सातिवली | १०१, ९० | ०.६४२ | संरक्षित वने |
| | | १०४/२८ | ०.०३० | संरक्षित वने |
| २४. | कुडे | १२३ | ०.२४० | संरक्षित वने |
| | | १२२ | ०.४९१ | संरक्षित वने |
| २५. | हलोली | १३३, १३२, १३४ | १.३३५ | संरक्षित वने |
| २६. | साये | १४/१६५ | ०.५०१ | राखीव वने |
| २७. | दुर्वेस | १५१, १५९ | ०.१९८ | संरक्षित / राखीव वने |
| २८. | टेण | ४५ | ०.०९६ | संरक्षित वने |
| | | ३६, ३४ | ०.२५२ | खाजगी वने |
| २९. | सावरखंड | ६६ | ०.२६४ | संरक्षित वने |
| ३०. | टाकवहाळ | ३३, २७ | ०.११७ | राखीव / संरक्षित वने |
| एकुण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | | | २२.२३० | |

## गोषवारा

| अनु. क्र. | विभाग | राखीव वने | संरक्षित वने | खाजगी वने | एकूण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | डहाणू | ४.४६० | १०.९३५ | ०.२५२ | १५.६४७ |
| २. | एफडीसीएम डहाणू | ४.२८८ | ०.०० | ०.०० | ४.२८८ |
| ३. | ठाणे | ०.०० | २.२९५ | ०.०० | २.२९५ |
| एकूण वनक्षेत्र (हेक्टर मध्ये) | | ८.७४८ | १३.२३१ | ०.२५२ | २२.२३० |

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९१०३०१२२१३३७३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**सही/-**

**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)**

वरील बाबतच्या केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी खालीलप्रमाणे

१. वनजमिनीची कायदेशिर स्थिती बदलणार नाही.

२. पर्यायी वनीकरण

अ) पर्यायी वनीकरणाचे काम प्रकल्प यंत्रणेच्या खर्चाने वन विभागामार्फत २३.०० हेक्टर निकृष्ठ वन जमिनीवर (सर्व्हे नं.३१५, गाव अगवन ता. डहाणू, जि. पालघर) येथे करावे. सदर क्षेत्रात शक्यतो स्थानिक वृक्ष प्रजातींची लागवड करावी व एकाच प्रजातींची वृक्ष लागवड टाळावी.

३. संबधित जिल्हाधिकारी यांचे विहीत नमून्यातील दाखल्यानुसार वनहक्क कायदा २००६ ची परिपूर्ण पुर्तता केल्याची खात्री करावी.

४. जमिनीखाली १.५ मी खोलीवर जलवाहिनी टाकावी व तद्नंतर जमिनीचे सपाटीकरण करावे.

५. प्रकल्प यंत्रणेने पर्यावरण (संरक्षण) कायदा १९८६ नूसार आवश्यक असल्यास पर्यावरणसंबधी मंजूरी करुन घ्यावी.

६. केंद्रशासनाच्या मान्यतेशिवाय प्रकल्पाच्या लेआऊट प्लान मध्ये कुठलाही बदल करु नये.

७. वनजमिनीवर मजुरांची वस्ती करु नये.

८. पुरेसे जळाऊ लाकुड किंवा इतर इंधन प्रकल्प यंत्रणेने वन विभाग किंवा वन विकास महा मंडळाकडून खरेदी करावे किंवा अन्य शासकिय स्त्रोता मार्फत पूरवावे.

९. संबंधित विभागीय वन अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प यंत्रणेने वळतीकरण झालेल्या वन जमिनीच्या हद्दीची योग्य रितीने आखणी करुन घ्यावी.

१०. प्रकल्पाचे काम करीत असतांना बांधकाम सामग्रीची वाहतूक करण्यासाठी वनजमिनीवर कुठलाही अतिरिक्त किंवा नविन रस्ता तयार करु नये.

११. या अंतिम मान्यतेखाली वनजमिन वळतीकरणाचा कालावधी प्रकल्प यंत्रणेला दिलेल्या भाडेतत्त्वावरील कालावधी किंवा आजीवन प्रकल्प कालावधी यापैकी जो कमी असेल त्यास बांधील राहील.

१२. वन प्रस्तावात नमूद केलेल्या बाबीं व्यतिरीक्त अन्य कुठल्याही बाबींसाठी वन जमिनीचा वापर करु नये.

१३. प्रस्तावित वळतीकरण होत असलेले वनक्षेत्र कोणत्याही परिस्थीतीत यंत्रणेस, विभागास किंवा व्यक्तीस भारत सरकारच्या परवानगी शिवाय हस्तांतरीत करता येणार नाही.

१४. प्रकल्पास लागू असलेले सर्व न्यायालयीन आदेश, तरतूदी, नियमन आणि मार्गदर्शक तत्वे याची खात्री करावी.

१५. कोणत्याही अटीचा भंग करणे म्हणजे वन (संवर्धन) अधिनियम १९८० भंग केल्यासारखे होईल आणि पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्वातील F.No.११४२/२०१७/FC दिनांक २९/०१/२०१८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

१६. वन व वन्यजीव यांचे संवर्धन, संरक्षण आणि विकासाच्या दृष्टीने पर्यावरण वन आणि जलवायु परिवर्तन यांच्याकडून वेळोवेळी लागू होणाऱ्या इतर अटी लागु राहतील.

**आदेशान्वये**

Fulrani